बिना सहकार नही उद्धार

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि., मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, वडाळा, पी. बी. नं. ७१२०, मुंबई - ४०० ०३१.




# ४३ वा वार्षिक अहवाल

## २०२१-२२

राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था

# भावपूर्ण श्रध्दांजली



**कै. भास्करराव उर्फ आबासाहेब कोठावदे**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे जेष्ठ संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक तथा सुवर्णा नागरी पतसंस्थेचे संस्थापक भास्करराव उर्फ आबासाहेब कोठावदे यांचे दुर्धर आजाराने दि. २४ मे, २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

फेडरेशनच्या कामकाजामध्ये कोठावदे साहेबांचा २० वर्षे सक्रिय सहभाग होता. सन २००९-१० या कालावधीत दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या अध्यक्ष पदाची आणि सन २००६-०८ या कालावधीमध्ये फेडरेशनच्या उपाध्यक्ष पदाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली होती. फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजामध्ये त्यांचे मौलिक मार्गदर्शन आम्हांला सातत्याने लाभत होते. शिवाय रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन यांचेशी निगडीत असलेल्या नागरी सहकारी बँकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील होते.

तसेच दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या., नाशिक जिल्हा पतसंस्था फेडरेशन तथा दि नाशिक मर्चंटस् को-ऑप. बँक लि. या संस्थांचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आणि आजतागायत दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन व दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या. या संस्थांचे संचालक म्हणून कर्तव्यदक्षपणे कामकाज सांभाळले. फेडरेशन मधील त्यांचे अस्तित्व आणि आधार आम्हांला नेहमीच स्फूर्तीदायक ठरला आहे.

सर्वासाठी आधारवड असलेल्या कै. कोठावदे साहेब यांच्या आकस्मिक निधनामुळे सहकारी बँकिंग क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व तसेच प्रेरणास्थान असलेली व्यक्ती काळाच्या ओघात हरवल्याची खंत फेडरेशनला नेहमीच होत राहील.

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या परिवारातर्फे दिवंगत भास्करराव उर्फ आबासाहेब कोठावदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

ॐ सर्वेशां स्वस्तिर्भवतु।
सर्वेशां शान्तिर्भवतु।
सर्वेशां पुर्णंभवतु।
सर्वेशां मङ्गलंभवतु।
ॐ शान्ति: शान्ति: शान्ति:।।

★★★★

# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रीडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.

दूरध्वनी क्र.: २४१३५७९७,२४१५११८५ • E-mail: admin@mucbf.com • web: www.mucbf.com


## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **२३ सप्टेंबर, २०२२** रोजी **दुपारी ०२:३० वाजता** 'भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१' येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.

२. दि. २९ सप्टेंबर,२०२१ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा. अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल, दि. ३१ मार्च, २०२२ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०२१-२२ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२२ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६. फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता अंतर्गत लेखापरीक्षक आणि शासन मान्यताप्राप्त लेखापरीक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक :२५/०८/२०२२

ठिकाण : वडाळा, मुंबई-३१

**सायली भोईर**

मुख्य कार्यकारी व सचिव

विशेष सुचना: फेडरेशनने आयोजित केलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर सन २०२१-२२ मध्ये उत्तम कामगिरी केलेल्या सभासद नागरी सहकारी बँकांना फेडरेशनच्यावतीने सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

टिप : १) किमान गणसंख्येअभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेपूर्वी (दुपारी १:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.

३) आर्थिक वर्ष २०२१-२२ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल, दोषदुरुस्ती अहवालासहीत फेडरेशनच्या वेबसाईटवर तसेच प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

## अध्यक्षीय भाषण

**फेडरेशनच्या सर्व नागरी सहकारी बँका व जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्सचे सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो**!

प्रथमत: दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनच्या २०२१-२२ सालच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्च्या सन्माननीय प्रतिनिधींचे मा. संचालक मंडळाच्यावतीने मी हार्दिक स्वागत करतो.

मंडळी! आपणांस अवगतच आहे की, नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात देशपातळीवर असलेल्या एकूण ठेवींपैकी ६१% ठेवी या केवळ महाराष्ट्रात आहेत. साहजिकच नागरी सहकारी बँकांप्रति रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेल्या कोणत्याही धोरणाचा सर्वांत जास्त प्रभाव महाराष्ट्रावर होतो. देशात असलेल्या २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांमधील खालील आकडेवारी पाहिल्यास, या क्षेत्रातील महाराष्ट्राचे स्थान निश्चितच अधोरेखित होईल.

**दि. ३१/०३/२०२१ अखेर**

(आकडे कोटीत)

| राज्य | एकूण बँका | एकूण शाखा | एकूण ठेवी (रु.) | एकूण ठेवींशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४९० | ६५२९ | ३,२५,३५२.७० | ६१.७४ % |
| गुजरात | २१८ | १०८२ | ६७,४१७.०७ | १२.७९ % |
| कर्नाटक | २६२ | १०४७ | ४५,४७२.७४ | ८.६३% |
| केरळ | ६० | ४८६ | १६,१०७.६० | ३.०६ % |
| आंध्र प्रदेश | ४६ | २०३ | १०,९०६.९५ | २.०७ % |
| इतर २३ राज्ये व ८ केंद्रशासीत प्रदेश मिळून | ४५८ | १५३३ | ६१,७२४.८९ | ११.७१ % |
| **एकूण** | **१५३४** | **१०८८०** | **५,२६,९८१.९५** | **१०० %** |

अशाप्रकारे रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याही धोरणांचा सर्वांत जास्त परिणाम महाराष्ट्रावर होत असल्याने रिझर्व्ह बँकेच्या अथवा केंद्र सरकारच्या सहकारी बँकांविषयीच्या सर्वच निर्णयांवर महाराष्ट्रातून जास्तीत जास्त प्रतिक्रिया येणे स्वाभाविकच आहे.

दि. १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन डेप्युटी गव्हर्नर श्री. एन. एस. विश्वनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एका तज्ज्ञ समितीचे गठन करीत नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी उपाय सुचविण्यास समितीला सांगितले. समितीने दि. २३ ऑगस्ट, २०२१ रोजी आपला अहवाल रिझर्व्ह बँकेस सादर केला. त्यातील काही शिफारशी पूर्ण, काही अंशत: स्वीकारत तर काही शिफारशींवर विचार करण्यास वेळ घेत रिझर्व्ह बँकेने दि. १९ जुलै, २०२२ रोजी देशातील

नागरी सहकारी बँकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन चार स्तरीय रचना प्रस्तावित केली आहे.

रिझर्व्ह बँकेने सुचविलेली ही चार स्तरीय रचना या क्षेत्राला नवीन मुळीच नाही. यापूर्वीही रिझर्व्ह बँकेने सन २००५ मध्ये तयार केलेल्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये रु. ५० कोटींच्या आत ठेवी असणाऱ्या व रु. ५० कोटींच्या वर ठेवी असणाऱ्या बँका अशा दोन स्तरात देशातील नागरी सहकारी बँकांचे वर्गीकरण केले होते. त्यानंतर दि. ०७ मार्च, २००८ मध्ये ठेवींची मर्यादा वाढवून रु. १०० कोटींच्या वरील बँका असे द्विस्तरीय वर्गीकरण करत त्यांच्यावरील नियंत्रणात्मक बाबींसाठी स्वतंत्र निकष केले होते. रु. १०० कोटींचे आतील बँकांना अनुत्पादक कर्जांसाठी १८० दिवसांच्या निकषांसह इतरही सवलती दिल्या गेल्या. नवीन धोरणांनुसार रिझर्व्ह बँकेने देशातील नागरी सहकारी बँकांचे त्यांच्याकडील एकूण ठेवींनुसार चार प्रवर्गात वर्गीकरण करण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार देशातील नागरी बँकांची वर्गवारी पुढीलप्रमाणे होईल.

(आकडे कोटीत)

| प्रवर्ग | ठेवींची मर्यादा | बँकांची संख्या | एकूण ठेवी (रु.) | एकूण ठेवींशी असलेले प्रमाण |
|---|---|---|---|---|
| I | रु. १०० कोटींच्या आत | ८५४ | ३३,९७२.३८ | ६.४५ % |
| II | रु. १०० कोटी ते रु. १००० कोटी | ५८७ | १,७७,९९१.५६ | ३३.७८ % |
| III | रु. १००० कोटी ते रु. १०००० कोटी | ८६ | १,९५,५२६.०१ | ३७.१० % |
| IV | रु. १०००० कोटींच्या पुढे | ७ | १,१९,४९२.०० | २२.६७ % |
| **एकूण** | | **१५३४** | **५,२६,९८१.९५** | **१०० %** |

रिझर्व्ह बँकेचे प्रमुख कार्य हे ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणे असल्याने ज्या बँकांकडे मोठ्या प्रमाणावर ठेवी आहेत, अशा बँकांना सक्षमतेचे कडक निकष लावले जातील. किंबहुना त्यांना व्यापारी बँकांप्रमाणेच निकष लावून कालांतराने त्यांचे रुपांतर व्यापारी बँकांमध्ये करण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार लपून राहिलेला नाही. रु. १०,००० कोटींच्या पुढे ठेवी असणाऱ्या देशातील सात बँकांपैकी सर्वच बँका या महाराष्ट्रातील आहेत. त्यातही सहा बँका मुंबईमधील व एक बँक पुण्यातील आहे. मुंबईस्थित पंजाब ॲण्ड महाराष्ट्र बँकेचे अस्तित्व संपुष्टात आल्याने या बँकांची संख्या आता सहा झाली आहे. दि. ३१ मार्च, २०२१ च्या रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार सुमारे रु. ४०,८०० कोटींच्या ठेवींसह मुंबईस्थित सारस्वत बँक प्रथम क्रमांकावर आहे. तर त्या खालोखाल शामराव विठ्ठल को-ऑपरेटिव्ह बँक (रु. १७,३३१ कोटी), पुणेस्थित कॉसमॉस को-ऑप. बँक (रु. १६,१५१ कोटी), टि. जे. एस. बी. सहकारी बँक (रु. १२,०४८ कोटी), भारत को-ऑप. बँक (रु. ११,६७६ कोटी), अभ्युदय को-ऑप. बँक (रु. १०,९५२ कोटी) यांचा क्रमांक लागतो.

देशपातळीवरील रु. १०० कोटींच्या आत ठेवी असणाऱ्या बँकांची संख्या ८५४ असली तरी त्यातही रु. १० कोटींच्या आतील (१०५ बँका), रु. १० कोटी ते रु. २५ कोटी (१९९ बँका),

रु. २५ कोटी ते रु. ५० कोटी (२६८ बँका), रु. ५० कोटी ते रु. १०० कोटी (२८२ बँका) यांचा समावेश असल्याने या बँकांसाठी सक्षमतेचे व नियंत्रणात्मक निकष थोडे शिथिल असतील हे उघड आहे. देशभरातील नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक सक्षमतेनुसार दि. ३१/०३/२०२१ अखेरील पुढील वर्गवारी पाहिल्यास हे क्षेत्र गुंतवणूकीच्या दृष्टीने सुरक्षित आहे असेच म्हणावे लागेल.

**दि. ३१/०३/२०२१ अखेरची वर्गवारी**

(आकडे कोटीत)

| वर्ग | बँकांची संख्या | या बँकांमधील एकूण ठेवी (रु.) | ठेवींचे प्रमाण |
|---|---|---|---|
| 'अ' व 'ब' | ११२४ | ३,९२,६५५.३९ | ७४.५१ % |
| 'क' | ३२४ | १,१०,२६८.६६ | २०.९२ % |
| 'ड' | ८६ | २४,०५७.९० | ४.५७ % |

याचाच अर्थ देशपातळीवर या क्षेत्रातील केवळ ४.५७% ठेवी या अडचणीत असल्याचे दिसून येते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार ९% चे भांडवल पर्याप्ततेचे निकष पूर्ण करणाऱ्या बँकांची संख्या १,५३४ पैकी १,४३८ असून त्यातही १२% वर भांडवल पर्याप्तता असलेल्या बँकांची संख्या तब्बल १,२७४ इतकी आहे. देशपातळीवरील या क्षेत्राचा स्वनिधी रु. ५१,४२२.३१ कोटी, निव्वळ नफा रु. ४,०६८.७८ कोटी असताना या क्षेत्राला गुंतवणूकीच्यादृष्टीने सक्षम न समजणे म्हणजे या क्षेत्रावर अन्याय केल्यासारखे आहे.

रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या बँकांना त्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम करण्यासाठी ५ वर्षांचा कालावधी प्रस्तावित केला आहे. सक्षमतेसाठी टिअर १ नागरी सहकारी बँकांकरिता रु. २.०० कोटीचे नक्त मुल्य तर इतर नागरी सहकारी बँकांचे नक्त मूल्य (Net Worth) किमान रु. ५.०० कोटी असण्याची अट रिझर्व्ह बँकेने घातली आहे. ज्या बँकांचे नक्त मूल्य निर्धारित मुल्याच्या आत असेल किंवा 'उणे' असेल त्यांनी पुढील पहिल्या ३ वर्षांत ते आवश्यकतेच्या ५० टक्के व उर्वरित २ वर्षांत उर्वरित ५० टक्के असे पूर्ण करावयाचे आहे. थोडक्यात बँकांना ५ वर्षांच्या कालावधीत नक्त मुल्याचे नियोजन करावयाचे असून, ज्यावेळी त्यांना हे ध्येय गाठणे अशक्य वाटेल, त्यावेळी त्यांना दुसऱ्या बँकेत विलीनीकरण करण्याचा विचार करावा लागेल. या नियमांमुळे लहान बँकांच्या एकत्रीकरणालादेखील चालना मिळेल हे नक्की.

वरील दोन प्रमुख मुद्यांबरोबरच नागरी सहकारी बँकांच्या शाखाविस्ताराचे निकष निश्चित करीत गेल्या कित्येक वर्षांपासून बंद केलेला शाखाविस्तार पुन:श्च पूर्वीप्रमाणे सुरु करीत रिझर्व्ह बँकेने या क्षेत्रात नवचैतन्य आणले असे नमूद केल्यास वावगे होणार नाही. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे सन २००२ नंतर रिझर्व्ह बँकेने एकाही सहकारी संस्थेस बँकींग परवाना दिलेला नाही, तसेच २००२ नंतर शाखा परवानेही स्थगित केले होते. सन २००६ मध्ये सर्व राज्यांशी सामंजस्य करार करत रिझर्व्ह बँकेने राज्य सरकारचे या बँकांवरील नियंत्रण जवळ-जवळ संपुष्टात आणत सर्व अधिकार स्वत:कडे

घेतल्यावर या बँकांच्या वार्षिक नियोजन आराखड्यानुसार सन २००८-०९ व सन २००९-१० या आर्थिक वर्षांत सुमारे २७५ बँकांच्या केवळ ४०२ शाखांना परवाना दिला होता. त्यानंतर कित्येक वर्ष या बँकांना नवीन शाखाविस्तारास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेली नव्हती. आता पुन:श्च पूर्वीप्रमाणेच रिझर्व्ह बँकेचे सक्षमतेचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या बँकांना त्यांच्या सध्याच्या एकूण शाखांच्या १०% किंवा जास्तीत जास्त ५ शाखांना परवाना देण्याचा धोरणात्मक निर्णय रिझर्व्ह बँकेने घेतला आहे.

वरील महत्त्वाच्या निर्णयांबरोबरच नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला व्यापारी बँकांप्रमाणेच समभाग, डिबेंचर्स व निरनिराळ्या बॉण्डस्च्या माध्यमातून भांडवल उभारणी करता यावी म्हणून बँकींग रेग्युलेशन ॲक्टमध्ये नुकत्याच झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर हे साध्य करण्यासाठी रचनात्मक उभारणी कशी करावी, यासाठी रिझर्व्ह बँक, 'सेबी' व केंद्रीय सहकार मंत्रालय यांची समिती स्थापण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. वास्तविक या समितीमध्ये नागरी सहकारी बँकींग क्षेत्राच्या प्रतिनिधीचा समावेश आवश्यक असताना तो का केला गेला नाही हे अनाकलनीय आहे. सध्याची 'सेबी' ची यंत्रणा ही केवळ कंपनी कायद्याखाली स्थापन झालेल्या बँकांनाच उपलब्ध असल्याने, 'सेबी' च्या धर्तीवर सहकारी बँकांसाठी स्वतंत्र यंत्रणा भविष्यात उभारली जाईल असे वाटते. कारण सहकारी बँकांच्या भागांची मूल्य निश्‍चिती, ग्रेडेशन, 'एक व्यक्ती एक मत' हे सहकारातील तत्व अबाधित ठेवत 'नॉन व्होटींग शेअर्स' च्या धर्तीवर भांडवल उभारणी इ. प्रमुख अडचणी लक्षात घेता 'सेबी' च्या धर्तीवर स्वतंत्र यंत्रणा उभारणी अनिवार्य ठरते.

एकूणच या परिपत्रकाद्वारे वरील महत्वाच्या मुद्यांव्यतिरिक्त समितीच्या अनेक शिफारशींवर भाष्य करण्यात आले आहे. एकंदरीतच हे परिपत्रक नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला दिलासा देणारे ठरेल यात शंका नाही. सबब या क्षेत्राने या परिपत्रकाचे स्वागतच केले पाहिजे.

यानंतर फेडरेशनच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा मी आपणांसमोर सादर करत आहे. फेडरेशनचा सन २०२१-२२ चा ४३ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले फेडरेशनचे दि. ३१ मार्च,२०२२ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, त्यावर कार्यालयाने तयार केलेला दोषदुरुस्ती अहवाल, सन २०२-२३ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे अंदाज पत्रक तसेच नागरी सहकारी बँकांसंदर्भात नियामकांनी जारी केलेल्या ध्येय धोरणांची माहिती, संचालक मंडळातील सदस्यांच्यावतीने सादर करताना मला अतिशय आनंद व समाधान होत आहे.

आपण जाणतच आहात की, फेडरेशन ही राज्यातील नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन सर्व प्रकारचे कार्यालयीन कामकाज उत्तमप्रकारे व समाधानकारकपणे करुन आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करत आलेली आहे.

त्याचप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणपूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समिती इ.च्या माध्यमातून फेडरेशन सभासद नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्यांचे निवारण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असते. रिझर्व्ह बँकेचे आर्थिक निकष व त्या राबविण्याच्या बाबी,

वैधानिक बंधने, धोरणात्मक समस्या यासंदर्भात तसेच बँकांना दैनंदिन कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत पत्राद्वारे व नागरी बँक वार्तापत्राद्वारे सतत मार्गदर्शन देखील फेडरेशन करीत असते.

त्याचबरोबर केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, सहकार खाते यांच्याकडून जारी केल्या जाणाऱ्या विविध योजनांबाबत तथा कायद्यातील घडामोडी इ. बाबत अद्ययावत माहिती नागरी सहकारी बँकांना उपलब्ध/अवगत करुन देण्याचे कार्य फेडरेशन करीत असते.

**फेडरेशनच्या चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाच्या घडामोडी**

अहवाल सालातील महत्त्वाच्या या घडामोडींमध्ये फेडरेशनतर्फे खालीलप्रमाणे प्रशिक्षण वर्ग, संवादसत्र इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संक्षिप्त स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

**दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशनतर्फे महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित केला जाणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनतर्फे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरी सहकारी बँकांकरिता आयोजित केला जाणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' वितरण सोहळा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात आलेल्या जमावबंदीच्या आदेशामुळे रद्द करण्यात आला होता.

★★★★

**प्रशिक्षण कार्यक्रम -**

**वर्षभरात फेडरेशनने सभासद बँकांचे पदाधिकारी, व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.**

१) फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी, महा व्यवस्थापक, मुख्य व्यवस्थापक तथा इतर व्यवस्थापक वर्गासाठी दि. एप्रिल ०९, २०२१ रोजी `Risk Based Internal Audit' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे मा. व्यवस्थापक, श्री. शिवपुत्र म्हेत्रे उपस्थित होते. त्यांनी Regulatory approach towards Risk Based Internal Audit, Objectives and Scope of Audit, Responsibilities of Audit Committee/Board of Directors/Senior Management of UCBs etc. या विषयांवर, तसेच चार्टर्ड अकौटंट मा. श्री. संजय राणे यांनी Methodology to link internal audit to bank's overall Risk Management, Enhancing Efficiency and Effectiveness of Internal Control Mechanism, Risk Management and Governance related to Systems and Processes, Identification of Auditable Areas, Risk Assessment, Audit Plan and Report या



विषयांवर आणि मा. श्री. रविकिरण मंकीकर यांनी Different types of Audit (Internal/Concurrent/Statutory /Tax/Revenue Audit), Roles and Responsibilities of Auditor, Importance of IT/IS/CS/VAPT/EDP Audit या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ४१ बँकांचे ७३ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

२. फेडरेशनने दि. ऑगस्ट २१, २०२१ रोजी नागरी सहकारी बँकांमधील गुंतवणूक विभागातील अधिकारी वर्गासाठी 'Treasury Management' या विषयावर **ऑनलाईन** पध्दतीने प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे मा. महा व्यवस्थापक, श्री. संजय कुमार यांनी Issue and Regulation of share capital and securities - Primary Urban Co-operative Banks इ. विषयांवर, तसेच कोषागार सल्लागार, मा. श्री. सुबोध कापडेकर यांनी Treasury perspective and functions, Primary and Secondary Market for SLR securities, interest rate and economic policies या विषयांवर आणि गुंतवणूक सल्लागार आणि बँकिंग तज्ज्ञ, मा. श्री. विवेक मांडलिक यांनी Investment Categorization, Risk Based Management इ. विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ४९ बँकांचे ६८ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

३. फेडरेशनने नागरी सहकारी बँकांकरिता दि. ऑक्टोबर ३०, २०२१ आणि दि. नोव्हेंबर २०, २०२१ रोजी `SARFAESI Act 2002' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास बँकिंग तज्ज्ञ, मा. श्री. मोहन किनिंगे यांनी step by step action points of SARFAESI Act 2002, Symbolic possession, clause in the mortgage deed, enforcement of security interest and recovery of debts laws and miscellaneous provisions (amendment) 2016, amendments to RDDBFI (DRT)Act 1993, DRT practical issues, Insolvency and Bankruptcy Code 2016, necessities for IBC, objectives, applicability, Adjudicating Authorities such as NCLT & Debt Recovery Tribunal, DRT & DRAT, recovery rate for borrowers, purchase of non-banking assets, precautions to be taken while purchasing non-banking assets, overview of compromise settlements, Negotiable Instruments Act 1881 & its objects, N.I. Sections 138, 139, 140, 141, 142, 143, 143A, 144, 145, 146, 147, 148 etc. या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दि. ऑक्टोबर ३०, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गास एकूण ३२ बँकांचे ५० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. तसेच दि. दि. नोव्हेंबर २०, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गास एकूण २८ बँकांचे ६३ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



४. फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्ज विभागातील महा व्यवस्थापक तथा मुख्य व्यवस्थापक वर्गासाठी दि. डिसेंबर १८, २०२१ रोजी `Credit Management' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते

म्हणून बँकिंग तज्ञ, मा. श्री. सदानंद नायक यांनी Credit Risk in Retail Loans, Commercial Loans, Unsecured Loans, Corporate Loans and Real Estate and CRE loans, Risk Mitigation tools and procedures, End Use of Funds, Credit Risk in Project Finance, Credit Portfolio Risk, Risk Mitigation Tools and Procedures, Restructuring of Loans, Documentation, Post Sanction Follow Up and Monitoring, Special Mention Accounts (SMA) या विषयांवर आणि बँकिंग तज्ञ, मा. श्री. विश्राम दिक्षित यांनी Working Capital Cycle and Various Methods of Calculating Working Capital Finance, Monitoring Techniques, Monitoring Mechanism, Case Studies या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण ३० बँकांचे ५५ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



५. फेडरेशनने आपल्या सभासद नागरी सहकारी बँकांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी व केवायसी विभागातील महा व्यवस्थापक, वरिष्ठ व्यवस्थापक तथा प्रधान अधिकारी वर्गासाठी दि. फेब्रुवारी २२, २०२२ रोजी `KYC and Anti Money Laundering' या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून रिझर्व्ह बँकेचे माजी महा व्यवस्थापक, मा. डॉ. अजित कुमार यांनी Importance and Elements of KYC, What is money laundering?, Important Provisions in the Master Direction on KYC Guidelines, Video based Customer Identification Process (V-CIP) या विषयांवर तसेच रिझर्व्ह बँकेचे महा व्यवस्थापक, मा. श्री. संजय कुमार यांनी FATF and its Importance for India and Supervisory Expectations from UCBs for FATF, Mutual Evaluation या विषयांवर तसेच रिझर्व्ह बँकेचे व्यवस्थापक, मा. श्री. सौरभ गुप्ता यांनी Risk Based Approach for KYC–AML, Supervision of select UCBs या विषयांवर आणि आर.बी.एल. बँकेच्या वरिष्ठ उपाध्यक्षा, कु. अमिता आजगावकर यांनी FIU-IND, Obligation of the Banks as Reportees, Identification of Beneficial Ownership, Identification and Monitoring of Suspicious Transactions, Red Flag Alerts, Re-KYC, C-KYC या विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास एकूण २८ बँकांचे ५७ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



★★★★

**टॅफकॅब**

भारतीय रिझर्व्ह बँकेने महाराष्ट्रासाठी निर्माण केलेल्या स्टेट लेवल टास्कफोर्सच्या मुंबई विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री. विद्याधर अनास्कर, तर नागपूर विभागासाठी होणाऱ्या सभांना फेडरेशनचे विद्यमान संचालक मा. श्री. सतिश गुप्ता तसेच बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी असलेल्या टॅफकबच्या सभांसाठी फेडरेशनचे विद्यमान संचालक मा. श्री. सि.बा.आडसूळ हे उपस्थित राहून नागरी सहकारी बँकांना न्याय मिळवून देण्याकरिता प्रयत्नशील असतात. त्याकरिता

टॅफकबवरील बँकांची पूर्वसभा बोलावून बँकांच्या समस्या जाणून घेऊन त्या टॅफकब समितीसमोर फेडरेशनच्या संचालकांमार्फत मांडल्या जातात. अशा वेळी या बँकांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता अथवा या बँकांच्या विनंतीवरुन विलीनीकरणाकरिता फेडरेशनतर्फे मोलाचे मार्गदर्शन देखील वेळोवेळी केले जाते.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागातर्फे २ सभा, नागपूर विभागातर्फे ५ सभा, तथा केंद्रीय विभागातर्फे बहुराज्यीय नागरी सहकारी बँकांसाठी १ सभा घेण्यात आली.

★★★★

**सभासदत्व**

अहवाल सालात कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. पनवेल, इंडिपेन्डस को-ऑप. बँक लि. नाशिक, शिवम सहकारी बँक लि. कोल्हापूर, दि कराड जनता सहकारी बँक लि. सातारा, वसंतदादा नागरी सहकारी बँक लि. उस्मानाबाद, भाग्योदय फेंडस् अर्बन नागरी सहकारी बँक लि. अमरावती या बँकांचे परवाने रद्द करण्यात आल्याने व पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँकेचे युनिटी स्मॉल फायनॅन्स बँकेमध्ये विलीनीकरण झाल्याने दिनांक ३१ मार्च,२०२२ अखेर ४७३ नागरी सहकारी बँका, १ सहयोगी सभासद व १८ नागरी सहकारी बँकांची विभागीय/जिल्हा असोसिएशन्स मिळून फेडरेशनची एकूण सभासद संख्या ४९२ झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील ज्या नागरी सहकारी बँका अद्याप फेडरेशनच्या सभासद झालेल्या नाहीत त्यांना फेडरेशनचे सभासद होण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात येत आहे.

★★★★

**राष्ट्रीय पातळीवरील संस्था**

सभासद बँकाना मार्गदर्शन करत असताना आपली फेडरेशन, राष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी सलोख्याचे संबंध ठेवून आहे. सहकार, बँकिंग व व्यापार उदीम क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील खालील संस्थांची फेडरेशन सभासद आहे.

- नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
- नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप.बँक्स ॲण्ड क्रेडीट सोसायटीज लि., नवी दिल्ली.
- इंडियन मर्चन्टस चेंबर, मुंबई.
- इंडियन बँक्स् असोसिएशन, मुंबई.
- इंडियन इन्स्टिटयुट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनॅन्स्, मुंबई.

वरील मान्यवर संस्थांकडून आलेली माहिती फेडरेशनच्या सर्व सभासद बँकांना वेळोवेळी वितरीत केली जाते.

★★★★

### विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

फेडरेशन MBA आणि Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा बँकिंग आणि सहकार विषयक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यास सर्वतोपरी मदत करीत असते. राज्याच्या विविध भागातून, जिल्ह्यांमधून भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक बाबी, सहकारी बँकांचा इतिहास आणि अलीकडील बँकिंग क्षेत्रातील घडामोडी इ. बाबत माहिती जाणून घेण्यासाठी अनेक विद्यार्थी फेडरेशनशी संपर्क साधत असतात किंवा कार्यालयास भेटी देत असतात. फेडरेशनतर्फे दि. फेब्रुवारी १७, २०२२ रोजी मुंबईतील साठये महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील तृतीय वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ‘नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचे महत्व’ या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमास व्याख्याते म्हणून बँकिंग तज्ञ, मा. श्री. शांताराम पाध्ये यांनी Entire Banking Sector in India, Structure of Co-operative Banks, History of Co-operative Banks, Objectives & Principles of Co-operation, What is Co-operative Banking?, Control and Regulations, Various Committees to be formed in the UCBs, Important sections of Various Acts such as Banking Regulation Act 1949, The Maharashtra Co-operative Societies Act 1960, Negotiable Instrument Act 1881 etc., Reserve Bank of India’s Role as Regulator - Supervision, Functions of Co-operative Banks, Kinds of Deposits, Operational Instructions, Types of Advances, Loans, Cash Credit, Bills Purchased/Discounted, Non fund based Advances, Process of Sanctioning loans and advances, Advantages of Co-operative banks and Significance of Co-operatives in India या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरच्या प्रशिक्षण वर्गास साठये महाविद्यालयामधील शिक्षकांसह एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते.

★★★★

### गृहनिर्माण सोसायट्यांसाठी स्वयं पूनर्विकास प्रकल्प

सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयं पूनर्विकास प्रकल्पासाठी कर्ज देण्याची परवानगी देणेबाबत चर्चा विनिमय करण्यासाठी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्या कार्यालयाने एक समिती स्थापन केली होती. फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव मा. सौ. सायली भोईर यांची सदर समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. या समितीने दि. ०९ फेब्रुवारी, २०२२ रोजी आपला अहवाल मा. सहकार आयुक्त व निबंधक यांना सादर केला आहे. यासंदर्भात लवकरच मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडून परिपत्रक जारी केले जाईल अशी अपेक्षा आहे, जेणेकरुन नागरी सहकारी बँकांना त्यांचे ग्राहक असलेल्या गृहनिर्माण संस्थांना स्वयं पूनर्विकास प्रकल्पासाठी कर्जे देणेसंदर्भातील असणाऱ्या अडचणी दूर होण्यात मदत होईल.

★★★★

### महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरण

महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाने दि. १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरणाच्या मा. निवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक खर्च कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना सुचविण्यासाठी ऑनलाईन बैठक आयोजित

केली होती. फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव यांनी आपले सहकार्य देऊन नागरी सहकारी बँका, त्यांच्या जिल्हा/विभागीय असोशिएशन्स् तथा फेडरेशनच्या निवडणूकीचा खर्च कमी करण्याची विनंती आयुक्तांना केली होती. तद्नंतर, महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक खर्चाबाबत दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकाचा पूनर्विचार करुन दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी सुधारित परिपत्रक जारी केले आहे व सहकारी संस्थांच्या होणाऱ्या निवडणूक खर्चात कपात करुन मोठा दिलासा या संस्थांना दिला आहे.

★★★★

**आर्थिक प्रगतीचा आलेख**

अहवाल वर्षातील ठळक घडामोडीवरुन आपल्या निदर्शनास आले असेलच की, नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीकरिता फेडरेशन सदैव सक्रिय राहीलेली आहे आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली राज्यस्तरीय संघीय संस्था म्हणून गणली जाते. गेल्या वर्षभरात ई-मेलच्या माध्यमातून तथा लेखी पत्रांद्वारे नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या समस्या, अडचणी प्रश्नरुपाने फेडरेशनला सादर केल्या व त्याची त्वरीत दखल घेऊन फेडरेशनही त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तत्पर राहीली आहे.

सन २०२१-२२ हे आर्थिक वर्ष आव्हानात्मक असूनही फेडरेशनने सर्व स्तरावर दिमाखदार कामगिरी करत आपला स्तर सातत्याने उंचावत नेला आहे. फेडरेशनच्या या प्रगतीचा मुद्देसुद तपशील वाढावा विभागणीसह मी आपणांसमोर सादर करीत आहे.

**वाढावा विभागणी**

दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर फेडरेशला प्राप्त झालेल्या उत्पन्नातून खर्च व तरतुदी वजा जाता शिल्लक राहिलेला वाढावा व त्यात गतवर्षीचा उरलेला वाढावा मिळविता एकूण रु. ९,२६,०१०.०२ पैसे फक्त वाढाव्याच्या स्वरुपात शिल्लक राहिले आहेत. सदर वाढाव्याची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात आली असून त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. तरी सदर वाढावा विभागणीस अंतिम मंजूरी देण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी २५% | रु. २,३१,५००.०० |
| इमारत आणि विकास निधी | रु. २,००,०००.०० |
| अनपेक्षित देणी निधी | रु. १,००,०००.०० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | रु. १,००,०००.०० |
| रजा रोखीकरण निधी | रु. २,९४,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | रु. ५१०.०२ |
| **एकूण** | **रु. ९,२६,०१० .०२** |

★★★★

## हिशेब पत्रके

सन २०२१-२२ या आर्थिक सालासाठी फेडरेशनच्या जिंदगी व देयता तसेच उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जिंदगी व देयता:** **(रु. लाखात)**

| **जिंदगी** | **३१/०३/२०२१** | **३१/०३/२०२२** |
|---|---|---|
| रोख व बँकांमधील शिल्लक | १३.९३ | ९९.६० |
| गुंतवणूक | ६४९.७९ | ६१७.५३ |
| फिक्सड ॲसेटस् | १५.५० | २०.२७ |
| प्रिमीअम ऑन लिज्ड् प्रिमायसेस | ३०.०० | ३०.०० |
| संकीर्ण येणी | १०९.४१ | ११३.९५ |
| **एकूण** | **८१८.६३** | **८८१.३५** |

| **देयता** | **३१/०३/२०२१** | **३१/०३/२०२२** |
|---|---|---|
| राखीव निधी | ९४.५२ | ९६.५३ |
| इमारत आणि विकास निधी | ३११.६० | ३३३.६० |
| कर्मचारी ग्रॅच्युइटी फंड | ८९.१३ | १०९.४९ |
| कर्मचारी रजा रोखीकरण निधी | ४९.८४ | ६७.०६ |
| अमोरटायझेशन निधी | १४.७५ | १५.२५ |
| अनपेक्षित देणी निधी | ६१.३७ | ७४.३७ |
| कर्मचारी कल्याण खर्च | ३६.४४ | ५६.४४ |
| निवडणूक निधी | ३.८२ | २.०० |
| गुंतवणूकीकरिता खास निधी | ३२.०० | ०.०० |
| बृहन्मुंबई ना.सह.बँक्स् असो. कडून मिळालेले प्रिमियम | ७.४५ | ७.४५ |
| चालू देणी व तरतुदी | १०९.७० | १०९.९० |
| एकूण वाढावा | **८.०१** | **९.२६** |
| **एकूण** | **८१८.६३** | **८८१.३५** |

**उत्पन्न व खर्च** **(रु. लाखात)**

| **उत्पन्न** | **३१/०३/२०२१** | **३१/०३/२०२२** |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | ९८.५० | १०२.५१ |
| गुंतवणूकीवर व इतर बाबींवर मिळालेले व्याज | ३५.९५ | ४१.१० |
| इतर उत्पन्न | २.२६ | ४६.७६ |
| **एकूण** | **१३६.७१** | **१९०.३७** |

| **खर्च** | ३१/०३/२०२१ | ३१/०३/२०२२ |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | ५१.५४ | ५६.२३ |
| कार्यालयीन खर्च | ३.१४ | ४.८९ |
| फी, कमिशन | १.७६ | ३.१५ |
| घसारा | २.११ | ३.०२ |
| मालमत्ता खर्च (भाडे, कर, विमा इ.) | ५.३१ | ५.७५ |
| इतर खर्च | १४.७७ | १६.०७ |
| विविध निधींमध्ये वर्ग | ५०.०७ | ९२.०० |
| खर्च वजा जाता वाढावा | ८.०१ | ९.२६ |
| **एकूण** | **१३६.७१** | **१९०.३७** |

**उत्पन्न, खर्च व वाढाव्याचा तुलनात्मक तपशील** **(रु.लाखात)**

| **तपशील** | ३१/०३/२०१९ अखेर | ३१/०३/२०२० अखेर | ३१/०३/२०२१ अखेर | ३१/०३/२०२२ अखेर |
|---|---|---|---|---|
| **उत्पन्न** | १५५.३६ | १९३.५२ | १३६.७१ | १९०.३७ |
| **खर्च** | १४८.०० | १८५.५२ | १२८.७० | १८१.११ |
| **वाढावा** | ७.३६ | ८.०० | ८.०१ | ९.२६ |

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सभासद बँकांकडून वसुल करण्यात आलेली थकीत वार्षिक वर्गणी, फेडरेशनने विविध बँकांमधील ठेवींमध्ये केलेली गुंतवणूक, प्रशिक्षण व अनुदान तसेच निवडणूक निधीसाठी ज्यादा केलेली तरतुद, पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँकेत केलेली गुंतवणूक उत्पन्नात वर्ग केल्यामुळे फेडरेशनला सुमारे रु. १९०.३७ लाखाचे उत्पन्न प्राप्त झाले असून त्यातून इतर खर्च व तरतुदी वजा जाता फेडरेशनला सुमारे रु. १०१.२६ लाखाचा एकूण वाढावा प्राप्त झाला आहे. सदर वाढाव्यातून सुमारे रु. ९२.०० लाखाची रक्कम विविध निधींमध्ये वर्ग करण्यात येऊन निव्वळ वाढावा रु. ९.२६ लाख इतका शिल्लक राहिलेला आहे. फेडरेशनची गुंतवणूक व बँकेतील शिल्लक रु. ६६३.७२ लाखावरुन रु. ७१७.१३ लाखाचे वर झाली आहे. तसेच राखीव व इतर निधीमध्ये ९ % पर्यंत वाढ झालेली असून मार्च, २०२२ अखेर राखीव व इतर निधी सुमारे रु. ७५४.७४ लाख झाला आहे.

★★★★

## संचालक मंडळ सभा

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ५ सभा व उपसमितीच्या २ सभा घेण्यात आल्या. सदर सभांमध्ये नागरी सहकारी बँकांच्या विविध प्रश्नांसंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. मा. संचालकांनी आपले यथोचित योगदान या सभांद्वारे प्रदान केले.

★★★★

## लेखापरीक्षण

फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतर्गत लेखापरीक्षण करण्यासाठी **मेसर्स प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस्,** चार्टर्ड अकौटंट, ठाणे यांची **'अंतर्गत लेखापरीक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि. १० मे, २०२२ रोजी अंतर्गत लेखापरीक्षण करुन आपला अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

तसेच वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील 'अ' गटातील **मेसर्स एस. डी. साटम ॲण्ड कंपनी,** चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची **'वैधानिक लेखापरीक्षक'** म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी दि. ०६ जून, २०२२ रोजी आपला वैधानिक लेखापरीक्षण अहवाल कार्यालयास सादर केला आहे.

मा. वैधानिक लेखापरीक्षक **मेसर्स एस. डी. साटम ॲण्ड कंपनी**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी फेडरेशनला लेखापरीक्षण वर्ग 'अ' दिलेला आहे. त्यांनी फेडरेशनच्या कामकाजामध्ये लेखापरीक्षणाच्या आधारे बहुमोल मार्गदर्शन करुन फेडरेशनच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्याबद्दल फेडरेशनतर्फे त्यांचे व त्यांच्या सहकारी वर्गाचे मन:पूर्वक आभार.

★★★★

## कर्मचारी वर्ग

फेडरेशनच्या सेवेत एक हिशेबनीस, दोन लिपीक, एक रिसेप्शनीस्ट व एक शिपाई इतका कायम कर्मचारी वर्ग व ३ कंत्राटी कर्मचारी असून मा.सौ.सायली भोईर या फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव म्हणून काम पाहतात.

★★★★

## अभिनंदन

❖ मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १४ जून, २०२२ रोजीच्या आदेशान्वये फेडरेशनचा समावेश राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रिया राबविणेसाठीच्या एजन्सी पॅनेलमध्ये करण्यात आला आहे.

★★★★

## बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा - २०२० - मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल

❖ बँकिंग नियमन (दुरुस्ती) कायदा - २०२० मधील अनेक तरतुदी या समस्त सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अस्तित्वाच्या दृष्टीने हितावह नसून या क्षेत्रास खाजगीकरणाचा पर्याय सुचिवणाऱ्या असल्याने तसेच सहकारी संस्थांचा कायदा, नियम, उपविधी, त्यातील तरतुदी तथा सहकारी तत्वांना छेद देणाऱ्या असल्याने या कायद्यास विरोध करणेसाठी फेडरेशनतर्फे मुंबई उच्च न्यायालयात दि. ०३ मार्च, २०२२ रोजी याचिका दाखल करणेत आली आहे.

★★★★

**भावपूर्ण श्रद्धांजली**

अहवाल सालात खालील मान्यवर, प्रतिष्ठित व्यक्तिंना देवाज्ञा झाली. त्यांना फेडरेशनच्या परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

❖ महाराष्ट्रातील प्रबोधन, पूरोगामी, परिवर्तनवादी चळवळींचे अग्रणी, जेष्ठ नेते, माजी सहकार मंत्री **प्रा. डॉ. एन.डी. पाटील** यांचे निधन झाले.

❖ भारताच्या गानकोकीळा म्हणून प्रसिध्द असलेल्या भारतरत्न गानसम्राज्ञी **लता मंगेशकर** यांचे निधन झाले.

❖ प्रख्यात भारतीय पर्यावरणवादी तथा चिपको आंदोलनाचे प्रणेते पद्म विभूषण **सुंदरलाल बहुगुणा** यांचे निधन झाले.

❖ हिंदी चित्रपटसृष्टीत ट्रॅजेडी किंग म्हणून ओळखले जाणारे अभिनेते पद्म विभूषण **दिलीप कुमार** यांचे निधन झाले.

❖ भारतीय नृत्याला जागतिक चेहरा आणि आधुनिक कथ्थक नृत्याचे शिल्पकार म्हणून ओळखले गेलेले प्रसिद्ध कथ्थक सम्राट, पद्म विभूषण **पंडित बिरजू महाराज** यांचे निधन झाले.

❖ जगविख्यात संतूरवादक, प्रयोगशील संगीतकार व संतूर वाद्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे पद्मभूषण **पंडित शिवकुमार शर्मा** यांचे निधन झाले.

❖ भारतीय धावपटू 'दि फ्लाइंग सिख' म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री **मिल्खा सिंग** यांचे निधन झाले.

❖ दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशनचे जेष्ठ संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक तथा सुवर्णा नागरी पतसंस्थेचे संस्थापक **भास्करराव उर्फ आबासाहेब कोठावदे** यांचे दुर्धर आजाराने निधन झाले.

❖ भारतीय सामाजिक कार्यकर्त्या तसेच हजारो अनाथांना आपुलकीच्या मायेचा आधार देणाऱ्या समाजसेविका पद्मश्री **डॉ. सिंधुताई सपकाळ (माई)** यांचे निधन झाले.

❖ भारताला १९८३ क्रिकेट विश्व चषक मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारे क्रिकेटपटू **यशपाल शर्मा** यांचे निधन झाले.

❖ छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अवघे आयुष्य समर्पित करणारे तपस्वी, प्रखर बुदिधमत्ता, सुक्ष्म विश्लेषण क्षमता आणि इतिहास लेखनाची विलक्षण प्रतिभा असलेले शिवशाहीर **बळवंत मोरेश्र्वर तथा बाबासाहेब पुरंदरे** यांचे निधन झाले.

❖ भारताच्या संरक्षण दलाचे प्रमुख - जनरल **बिपीन रावत** यांचे अपघाती निधन झाले.

❖ ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते **डॉ. अनिल अवचट** यांचे निधन झाले.

- ❖ हिंदी - मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते **रमेश देव** यांचे निधन झाले.
- ❖ भारताचे प्रसिद्ध व्यावसायिक, बजाज ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज्चे सर्वेसर्वा **राहूल बजाज** यांचे निधन झाले.
- ❖ वृत्त निवेदनातून आपल्या आवाजाने घराघरात पोहचलेले, बातम्या, घडामोडींच्या क्षेत्रातील जाणकार आणि निखळ व्यक्तिमत्त्व **प्रदीप भिडे** यांचे निधन झाले.

याशिवाय देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान, थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, बँकिंग व आर्थिक क्षेत्रातील प्रतिभावंत व्यक्ती, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा इ. क्षेत्रातील ख्यातीप्राप्त व लोकप्रिय व्यक्ती तसेच कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे व नैसर्गिक आपत्तीमध्ये निधन पावलेल्या इतर ज्ञात-अज्ञात, निरपराध दिवंगत व्यक्तींना फेडरेशनतर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

★★★★

**आभार व ऋणनिर्देश**

अहवालसाली खालील व्यक्तींनी/संस्थांनी फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजात मोलाचे सहाय्य व मार्गदर्शन केले.

राज्याचे माजी मुख्यमंत्री **मा.श्री.उद्धव ठाकरे**, माजी उपमुख्यमंत्री **मा.श्री.अजितदादा पवार**, माजी महसूलमंत्री **मा.श्री.बाळासाहेब थोरात**, माजी सहकारमंत्री **मा.श्री. बाळासाहेब पाटील**, माजी सहकार राज्यमंत्री **मा.श्री. विश्वजीत कदम**, माजी केंद्रीय कृषी मंत्री व खासदार **मा.श्री.शरदचंद्रजी पवार**, सहकार विभागाचे प्रधान सचिव **मा.श्री. अनुप कुमार**, सहकार आयुक्त **मा.श्री.अनिल कवडे**, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त **मा.डॉ.जगदीश पाटील**, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर **मा. श्री. शक्तिकांत दास**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग रेग्युलेशन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री. एम.राजेश्वर राव**, कार्यकारी संचालक **मा.श्री. सौरव सिन्हा**, मुख्य सरव्यवस्थापक **मा.श्री. आर. लक्ष्मीकांत राव**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ को-ऑप.बँकिंग सुपरव्हिजन या विभागाचे डेप्युटी गव्हर्नर **मा.श्री.एम.के.जैन**, कार्यकारी संचालक **मा.श्री.एस. सी. मुरमु**, रिझर्व्ह बँकेच्या डिपार्टमेंट ऑफ सुपरव्हिजनचे मुख्य सरव्यवस्थापक **मा. श्री. अर्नब कुमार चौधरी**, उपनिबंधक (अर्बन बँका) **मा.डॉ.आनंद कटके**, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग कॉलेजचे प्रिन्सीपाल **मा. श्री. व्ही. जी. सेकर**, इंडियन बँक्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी, **मा.श्री. सुनिल मेहता**, नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष **मा.श्री.ज्योतिंद्र मेहता**, नॅशनल को-ऑप.युनियन ऑफ इंडियाचे अध्यक्ष **मा.श्री. दिलीप संघानी**, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक **मा.डॉ.अजित देशमुख**, फेडरेशनचे वैधानिक लेखापरीक्षक **मे. एस.डी.साटम ॲण्ड कंपनी**, चार्टर्ड अकौटंट, मुंबई व अंतर्गत लेखापरीक्षक **मे.प्रितम नेवरेकर ॲण्ड असोसिएटस्**, चार्टर्ड अकौटंट, ठाणे तसेच फेडरेशनच्या यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती, जिल्हा व विभागीय

असोसिएशन्स, फेडरेशनच्या विविध उपक्रमास लोकाभिमुख करणारी प्रसिध्दी माध्यमे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे मी याप्रसंगी आभार मानतो.

फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत असताना, सभासद नागरी सहकारी बँका/ जिल्हा-विभागीय असोसिएशन्सच्या पदाधिकाऱ्यांनी फेडरेशनला दिलेला सक्रिय पाठिंबा, सहकार्य तसेच फेडरेशनचे कामकाज करताना केलेल्या सूचना फेडरेशनला नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. फेडरेशनची उद्दिष्टे नजरेसमोर ठेऊन सभासद बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी तसेच माझ्या सहकाऱ्यांनी सातत्याने केला आहे, त्याचे फलित म्हणूनच आपल्या सर्वांच्या सहकार्याने फेडरेशन प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. ही जबाबदारी पेलताना प्रत्येक संचालकांनी दिलेल्या सहकार्याबरोबर विद्यमान उपाध्यक्ष मा.श्री रमाकांत खेतान यांनी दिलेली मोलाची साथ तसेच मुख्य कार्यकारी व सचिव सौ.सायली भोईर व सेवक वर्ग या सर्वांनी फेडरेशनचे कामकाज करण्यामध्ये मला उत्तम सहकार्य केले आहे, त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. आजवरचा हा विश्वास, जिव्हाळा, प्रेम व सहकार्य असेच कायम राहो ह्याच अपेक्षांसह फेडरेशनच्या सेवेसाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन पुनश्च देवून मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभासद बंधू-भगिनींनो, सन २०२१-२२ च्या अहवालासंबंधातील माहितीचे विवेचन मी आतापर्यंत आपणांस या भाषणाच्या निमित्ताने सादर केले आहे. यानंतर विषय सूचीप्रमाणे दि. ३१ मार्च, २०२२ रोजीचे ताळेबंद पत्रक व आयव्यय पत्रक, आगामी वर्षाचे अंदाज पत्रक इत्यादींचा तपशील या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आला आहे. आपणाकडे सादर केलेला अहवाल, आय-व्यय पत्रक, ताळेबंद पत्रक, वाढावा विभागणी आणि अंदाज पत्रक आपण स्वीकृत करावे तसेच फेडरेशनच्या सर्वांगीण प्रगतीकरिता आपण सर्वांनी सहकार्याचा हातभार लावावा ही नम्र विनंती.

जय हिंद । जय महाराष्ट्र । जय सहकार ।

**विद्याधर अनास्कर**
अध्यक्ष

★★★★

## दिनांक २९ सप्टेंबर,२०२१ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँका व सभासद जिल्हा/ विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची **४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २९ सप्टेंबर,२०२१** रोजी **दुपारी १२:३० वाजता** 'भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१' येथे संपन्न झाली. सदर सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने तसेच ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. सदर सभेस खालील सभासद नागरी सहकारी बँका व सभासद जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्चे प्रतिनिधी उपस्थित होते.

| **प्रतिनिधींचे नाव** | **बँकेचे / असोसिएशन्स्चे नाव** |
|---|---|
| मा.श्री.विद्याधर अनास्कर | विद्या सहकारी बँक लि.,पुणे |
| मा.श्री.रमाकांत खेतान | दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप. बँक लि.,अकोला |
| मा.श्री.संदिप घनदाट | अभ्युदय को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा.श्री.ज्ञानेश्वर वांगडे | दि सातारा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा.श्री.भास्करराव कोठावदे | दि ओझर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., ओझर |
| मा.श्री. अजय ब्रम्हेचा | दि लासलगांव मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., लासलगांव |
| मा.श्री.अुत्तम जोशी | ठाणे भारत सहकारी बँक लि., ठाणे |
| मा.श्री. विजय ढेरे | पुणे मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., पुणे |
| मा.श्री.सुनिल देवडा | ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि., हिंगोली |
| मा. श्री. सतिश गुप्ता (सिस्को वेबेक्सद्वारे) | दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि., बुलढाणा |
| मा.श्रीमती शोभाताई सावंत | दि अण्णासाहेब सावंत अर्बन को-ऑप. बँक लि., महाड |
| मा.डॉ.शशीताई अहिरे | दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँक लि.,नाशिक |
| मा.श्री.जयवंत जालगांवकर | दापोली अर्बन को-ऑप. बँक लि., दापोली |
| मा. श्री.अशोक शेळके (सिस्को वेबेक्सद्वारे) | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि., अहमदनगर |
| मा.श्री.प्रकाश गवळी | जनता सहकारी बँक लि., सातारा |
| मा.श्री.संजय भेंडे | नागपूर नागरिक सहकारी बँक लि.,नागपूर |
| मा. श्री. सि.बा. आडसूळ | दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असो.लि., मुंबई |
| मा.सौ.सायली भोईर | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.,मुंबई |
| मा. श्री. एम.पी. पाटील | राजे विक्रमसिंह घाटगे को. ऑप. बँक लि., कोल्हापूर |
| मा. श्री. सुनिल ना. रुकारी | दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे |
| मा. श्री. पुरुषोत्तम सि. लांडगे | दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे |
| मा. श्री. अशोक कुमार वाडकर | दापोली अर्बन को-ऑप. बँक लि.,दापोली |
| मा. सौ. रमा सुशांत बेलोसे | दापोली अर्बन को-ऑप. बँक लि.दापोली |
| मा. श्री. बाबु लक्ष्मण टिपे | अंबरनाथ जयहिंद को-ऑप. बँक लि., अंबरनाथ |
| मा. श्री. विजय कुरणकर | अंबरनाथ जयहिंद को-ऑप. बँक लि., अंबरनाथ |
| मा. श्री. अनंत गणु तांबे | दि कुणबी सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. संजय करंबे | दि कुणबी सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. नित्यानंद प्रभु | अभ्युदय को-ऑप. बँक लि., मुंबई |

| | |
|---|---|
| मा. श्री. चंद्रकांत पाटील | अभ्युदय को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. काशिनाथ मोरे | डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. कृष्णा परब | ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्री. राजेश पवार | श्रीजी भाटिया को-ऑप. बँक लि.,मुंबई |
| मा. श्री. गोकुलदास राऊत | शिक्षक सहकारी बँक लि., अमरावती |
| मा. श्री. संजय भेले | दि अमरावती सहकारी बॅंक लि., अमरावती |
| मा. श्री. श्रीनिवास दुर्वे | दि सातारा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. रमेश महाजन | दि सातारा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. एस. आर. पाटील | दि सातारा सहकारी बँक लि.,मुंबई |
| मा. श्री. दत्ताराम चाळके | अपना सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. मुस्ताली नंदुरबारवाला | बॉम्बे मर्कंटाईल को-ऑप. बँक लि.,मुंबई |
| मा. श्री. महावीर दा. बनगर | म्युनिसिपल को-ऑप. बँक लि., मुंबई |
| मा. श्रीमती अनुश्री माळगावंकर | मराठा सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. विलास देसाई (सिस्को वेबेक्सद्वारे) | अंबरनाथ जयहिंद को-ऑप. बँक लि., अंबरनाथ |
| मा. श्री. अशोक खलाणे (सिस्को वेबेक्सद्वारे) | मॉडर्न को-ऑप. बँक लि., जळगाव |
| मा. श्री. दादासाहेब बी. पाटील (सिस्को वेबेक्सद्वारे) | दि बाबासाहेब देशमुख सहकारी बँक लि.,सांगली |
| मा. श्री. मुकुंद कळमकर (सिस्को वेबेक्सद्वारे) | सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि., परभणी |
| मा. श्री. संजय राजेश्वर (सिस्को वेबेक्सद्वारे) | ओमप्रकाश देवडा पीपल्स् को-ऑप. बँक लि., हिंगोली |
| मा. श्री. विजय बोतरा (सिस्को वेबेक्सद्वारे) | अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि., अमरावती |
| मा. श्री. अशोक पाटील (सिस्को वेबेक्सद्वारे) | आदरणीय पी.डी. पाटीलसाहेब सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्रीमती रेखाताई कुलकर्णी (सिस्को वेबेक्सद्वारे) | माणदेशी महिला सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्री. शिवाजीराव जाधव (सिस्को वेबेक्सद्वारे) | शिवदौलत सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्री. प्रकाश पाटील (सिस्को वेबेक्सद्वारे) | पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँक लि., पुणे |
| मा. श्री. संजय नरके (सिस्को वेबेक्सद्वारे) | शिक्षक सहकारी बँक लि., नागपूर |
| मा. श्री. नारायन तुकाराम थेटे (सिस्को वेबेक्सद्वारे) | गोदावरी अर्बन को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा. श्री. भगवान जाधव (सिस्को वेबेक्सद्वारे) | कृष्णा सहकारी बँक लि., सातारा |
| मा. श्री. संदिप नाटकर (सिस्को वेबेक्सद्वारे) | दि जनलक्ष्मी को-ऑप. बँक लि., नाशिक |
| मा. श्री. राजेंद्र पाटील (सिस्को वेबेक्सद्वारे) | धुळे ॲण्ड नंदुरबार जिल्हा सरकारी नोकराची सहकारी बँक लि., नाशिक |
| मा. श्री. विठ्ठल चिविलकर (सिस्को वेबेक्सद्वारे) | कुणबी सहकारी बँक लि., मुंबई |
| मा. श्री. भरत मोरे (सिस्को वेबेक्सद्वारे) | नवी मुंबई को-ऑप. बँक लि., नवी मुंबई |
| मा. श्री. पंढरीनाथ माळी (सिस्को वेबेक्सद्वारे) | श्री लक्ष्मी महिला सहकारी बँक लि., सांगली |
